# तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय
## ता.सावंतवाडी

ई-मेल - tmosawantwadisindhu01@gmail.com


जा.क्र.ताआअका/प्रशा./UHWC दरपत्रक/७७९/२०२६.

तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, ता.सावंतवाडी.
दिनांक – ०६/०३/२०२६
०७

## दरपत्रक मागणी नोटीस

सावंतवाडी शहरात शहरी आरोग्यवर्धिनी केंद्र सुरु करणेसाठी उपजिल्हा रुग्णालय, सावंतवाडी पासुन एक / दोन किलोमीटर च्या बाहेर खालीलप्रमाणे तपशिलात नमूद केलेप्रमाणे जागा भाडेतत्वावर घ्यावयाची आहे. तरी इच्छुक दरपत्रक धारकांकडून खालील तपशिलात नमूद केलेप्रमाणे बंद लखोटयात दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | जागेचा तपशिल | आवश्यकता आहे | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | सावंतवाडी शहरात उपजिल्हा रुग्णालय, सावंतवाडी पासुन एक किलो मीटर च्या बाहेर (जुना बाजार, उभा बाजार, माठेवाडा, बाहेरचावाडा, वैश्यवाडा या भागात ) | किमान 1,500 ते 2000 स्केअर फुटमध्ये स्वतंत्र चार खोल्या, तळमजला, पार्किंगची, टॉयलेटची व्यवस्था व तसेच सदरचे ठिकाण हे लोकवस्तीत असणे आवश्यक आहे. तसेच ठिकाण अपार्टमेंट मध्ये असेल तर सोसायटीचे नाहरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे. | |

इच्छुक दरपत्रक धारकांनी सदरची दरपत्रक नोटीस प्रसिध्द झालेपासून 8 दिवसांपर्यत म्हणजेच दिनांक 17/03/2026 रोजी दुपारी 01.00 वाजेपर्यत को-या कागदावर परिपूर्ण दरपत्रक बंद लखोटयातून या कार्यालयास समक्ष आणून अथवा डाक सेवाव्दारे सादर करावयाची आहेत. मुदतीत प्राप्त दरपत्रकांची छाननी करुन अटी व शर्तीपूर्ण झालेली दरपत्रके खोलून तुलनात्मक तक्त्याच्या आधारे किफायतशीर दरपत्रक धारकला पुढील आदेश देणेत येईल.

## दरपत्रकाच्या अटी व शर्ती

01) दरपत्रक सादर करतेवळी दरपत्रकासोबत शासकिय संस्थेमार्फत दिलेला जागा मालकीचा पुरावा सातबारा व ८ अ प्रमाणपत्र तसेच जागा मालकाचे पॅनकार्ड झेरॉक्स सोबत जोडावयाचे आहेत. दरपत्रक सोबत सादर करावयाच्या बंद लखोटयांत जागा मालकीचा पुरावा सातबारा व ८ अ प्रमाणपत्र, घरपत्रक उतारा व मालकाचे पॅनकार्ड झेरॉक्स सोबत सादर करणे आवश्यक आहे अन्यथा सदरची दरपत्रक नामंजूर करणेत येतील.

02) वरील तपशीलात आवश्यकतेनुसार ज्या दरपत्रक धारकाचे दरपत्रक मंजूर होईल त्यांचेकडुन पाच वर्षांपर्यंतचा भाडेकरार करणे आवश्यक आहे. तसेच सदर जागेची दुरुस्ती व इतर आवश्यक ते बदल जागा मालकाने स्वता करुन देणेचे आहे. त्याकरीता अतीरिक्त कोणत्याही प्रकारचे चार्जेस अदा केले जाणार नाहीत.

03) पाणी बिल, लाईट बिल कार्यालयामार्फत भरणा करण्यात येईल-

04) मंजूर दरपत्रकानुसार जागा मालकाने दरमहा भाडेपावती कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. प्राप्त झालेला भाडेपावती देयकाची रक्कम संबधीत जागा मालकाच्या बॅक खातेवर पीएफएमएस प्रणालीनुसार शासकिय वजावटी कपात करुन जमा करणेत येईल.

05) मुदतीत प्राप्त न होणारी एक अगर सर्व दरपत्रके नाकारण्याचा अधिकार तसेच सर्व दरपत्रक प्रकीया रदद करण्यांचा अधीकार खाली सही करणार यांनी राखुन ठेवला आहे.

तालुका आरोग्य अधिकारी (गट-अ)
ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग

**दरपत्रक मागणी नोटीस लावण्याचे ठिकाण**

01) तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, सावंतवाडी नोटीसबोर्ड
02) www.nrhm.maharashtra.gov.in
03) www.arogya.maharashtra.gov.in

**वरील संकेतस्थळावरदरपत्रक नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून 7 दिवसाच्या मुदतीत दरपत्रक स्वीकारली जातील याची नोंद घ्यावी.**